# 'स्त्रीवाद आणि स्त्रीवादी चळवळ'

डॉ.वासंती रासम राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

स्त्रीवाद ही एक स्त्रियांच्या संदर्भातील सामाजिक, आर्थिक, राजकीय समान हक्कांची मागणी करणारी चळवळ आणि विचारसरणी आहे. स्त्रीवादी सिध्दांत अशा अनेक चळवळीतून उदयास आलेल्या आहे. स्त्रीवादी सिध्दांतात लिंगभाव असमानतेचे स्वरुप समजावून घेणेही महत्वाचे ठरते. असमानता समजावून घेत असताना स्त्रियांची सामाजिक भूमिका व त्यांना तृया भुमिका जगत असताना अनुभवाचे परीक्षण करणे आवश्यक आहे. स्त्रीवाद अशा परीक्षणाच्या आधारावर आणि स्त्रीयांच्या प्रश्नासंबंधी लैंगिक व लिंगभावाचे सामाजिक संरचना मांडण्याचे प्रयत्न करीत आहे. स्त्रीवादी कार्यकर्त्यांनी– कायदा, मालमत्ता, राजकीय सहभागासारख्या अनेक महिला हक्कांच्याविषयी मागणी करीत स्त्रीयांचे कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक अत्याचार या संदर्भात संरक्षणाची ही मागणी केली आहे.

स्त्रीवादी सिध्दांत हा स्त्रीवादाच्या सैध्दांतिक/तत्वज्ञानाच्या विचाराचा विस्तार आहे. स्त्रीवादी सिध्दांताच्या माध्यमातून लिंगभाव, असमानता जाणून घेणे व तसेच लिंगभाव राजकारण सत्तासंबंधी व लैंगिकतेवर भर देणे होय. सामाजिक राजकीय संबंधाचे विश्लेषण करीत असताना स्त्रिायांचे हक्क व हिंत यावर भर देणे गरजेचे आहे.

**स्त्रीवाद– पार्श्वभूमी:–** स्त्रीमुक्ती चळवळ आणि स्त्रीवाद ही महायुध्दोत्तर कालखंडात उदय झाला असला तरी स्त्रीवादी चळवळ आणि स्त्रीमुक्ती विचारधारावर ख–या अर्थाने उदारमतवादी तत्यविचारांमधूनच त्याचा जन्म झाल्याचे दिसते. उदारमतवादी विचारामध्ये व्यक्ती ही समाजाच्या केंद्रस्थानी मानला जातो आणि प्रत्येक व्यक्ती आपल्या बुध्दीच्या आधारे तो स्वत:च्या हिताचा विचार करतो. विचारानुसार आचार उच्चार निवड आणि निर्णय करण्यास त्यास स्वातंत्र्य असले पाहिजे असे उदारमतवादी विचारातून माडण्यात आले. प्रत्येक व्यक्तीचे त्यामुळे स्वातंत्र्य आणि स्वायतत्ता जपली पाहिजे हे मान्य करीत असताना ती व्यक्ती जेव्हा सार्वजनिक जीवनात वावरते त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर काही मर्यादा येतात ज्यामुळे अनिर्बध स्वातंत्र्य उपभेगता येत नाही. सार्वजनिक जीवनात इतर व्यकतींच्या बरोबरीने जगत असताना देवाण–घेवाण, तडजोड, अवलंबून राहणे किंवा एकमेंकाचे सहकार्य केल्याशिवाय पर्याय नाही असे सुध्दा उदारमतवादात मांडण्यात आले आहे. खाजगी जीवनात व्यक्तीस्वातंत्र्यावर काही अल्पप्रमाणात म्हणजेच किमान निर्बंध या अर्थाने कमीत कमी हस्तक्षेप व जास्तीत जास्त स्वातंत्रय ('Minimum Intervention Maximum Liberty') या तत्वानुसार व्यक्तीला स्वतंत्र्य देण्यातचं व्यक्ती व समाजाचे हित आहे असे उदारमतवाद प्रतिपादीत करतो. या विचाराच्या आधारावरच उदारमतवादाने खाजगी आणि सार्वजनिक अशा व्यक्तीजीवनाची विभागणी केली. सार्वजनिक जीवन जगत असताना सार्वजनिक जीवनाचे निर्बंध खाजगी व्यक्तिस्वांत्र्यावर आतिक्रमण करु शकते. आणि स्वातंत्र्याचा संकोच होऊ शकतो. या संदर्भात उदारमतवादाने एकीकडे नागरी स्वातंत्र्य व नैसर्गिक हक्क आणि दुसरीकडे राज्यसंस्था तसेच समाजातील अन्य संस्थांच्या सत्ता या कायद्याच्या माध्यमातून मर्यादीत पाहिजे असे उदारमतवाद प्रतिपादीत करतो. व्यक्तीचे स्वांतत्र्य जपण्यासाठी नैसर्गिक हक्कांना व नागरी स्वातंत्र्यांना मान्यता देऊन व्यक्तीस्वातंत्र्य अधिक चांगल्या पध्दतीने जपता येते. हे व्यक्तीस्वातंत्र्य सर्व व्यक्तींना समान असते. त्यामुळे कोणताच भेदभाव न करता समाजातील प्रत्येक व्यक्तीस स्वातंत्र्य प्राप्त झाले पाहिजे.उदारमतवादाच्या माध्यामातून व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तीप्रतिष्ठा व समानता याचा पुरस्कर उदारमतवादाने केला. हे करीत असताना मानवतावाद, विवेकानिष्ठ व ईश्वर नैतिकतेचा पुरस्कार करुन कालबाहय रुढी, प्रथा, पुरोहितशाही अशा जाचक प्रथेतून उदारमतवादाने माणसाला मुक्त केले आणि समाजजीवनातील सर्व व्यक्ती स्वातंत्र्य आहेत व व्यक्ती–व्यक्तीमध्ये सुध्दा समता असते असे एकंदरीत उदारमतवादी विचारसारणीत मांडण्यात आले आहे. याच समतेच्या मूळ मंत्रावर आधारीत समाजातील अर्धलोकसंख्या असणा–या स्त्रीयांना पुरुषाच्या प्रमाणे स्वातंत्र्य व समतेचे जीवन जगण्याचा हक्क नाही का ? असे प्रश्न काही उदारमतवादी विचार करणा–या व्यक्तीकडून मांडण्यात आले.

पाश्चिमात्य राष्ट्रामध्ये स्त्रीवादी विचार १८ व्या शतकातपासुन माडण्यात आले. विशेषत: १७९२ मध्ये मेरी वोल्स्टनक्राफ्ट यांनी Vindication of the Rights of Women (स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली ) हा ग्रंथ प्रसिध्द केला. या ग्रंथाद्वारे तत्कालीन स्त्रीवर होणारे अन्याय ही गुलामगिरीच असून यातून स्त्रीयांना मुक्त होणे आवश्यक आहे असे विचार वोल्स्टनक्राफ्ट नी मांडले आहे. स्त्री– पुरुषामध्ये असलेला भेद पारंपारिक विचारांवर आधारलेला असल्यामुळे वोल्स्टनक्राफ्ट यांनी समाज्याच्या दृष्टीकोनातून पुरुष हा मर्दानी विचारप्रधान व विवेकी असतो व स्त्री नाजूक भावनाप्रधान व विकारी असते. या सर्व पारंपारिक दृष्टीकोनातून वोल्स्टनक्राफ्ट यांनी स्त्री पुरुषा मध्ये समान लक्षणे असतात त्यामुळे पुरुषांप्रमाणे स्त्री ही विचारक्षम, विवेकी असते. पुरुषाप्रमाणे तीही मानव असल्यामुळे ज्या आधारावर पुरुषांना हक्क व आधिकार दिले आहेत, तो आधिकार स्त्रीयांनाही असले पाहिजे असे मत मांडले. जर स्त्रीचा पुरुषापेक्षा स्वभाव वेगळा असेल उदा. स्त्रीयां या भाबडेपणा, भित्रेपणा, विचारशुन्य आणि सौंदर्याला महत्व देणा–या असतील तर हा स्वभाव शिक्षणाच्या अभावामुळे आसल्याचे मत मांडत असताना वोल्स्टनक्राफ्ट यांचे म्हणणे असे आहे की, हे सर्व दोष व स्वभाव पुरुषांच्या जुलूमशाहीमुळे झाले आहेत. स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने जगावयास हवे असेल तर वुल्स्टोनक्राफ्ट यांच्या म्हणण्यानुसार पुरुषांप्रमाणे स्त्रीयांना शिक्षण मिळायला पाहिजे. जेणेकरुन तीच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण होवून तिचे स्वातंत्र आस्तित्व निर्माण होईल. ती आधिक विचारक्षम विवेकी, सुबुध्दीप्रमाणे व आत्मविश्वासाने व जबाबदारीने आपली कर्तव्ये पार पाडील.

स्त्रीवादाच्या संदर्भातील दुसरी मांडणी १८६९ मध्ये प्रकाशित झालेल्या जॉन स्टुअर्ट मिल यांच्या 'The Subjugation of Women' या ग्रंथाच्या मांडणीतून विवाहसंस्था, कुटुंबसंस्था व पारंपारिक (माता गृहिणी, बहीणी, पत्नी) भूमिकांचे उद्धातीकरणास मिल यांनी विरोध केला आहे. विवाह संस्था ही स्त्रीयांच्या व्यक्तीमत्वाकडे दुलर्क्ष करते त्यामुळे त्याला एका प्रकारचे गुलामगिरीचे रुप प्राप्त झाले आहे. या विवाहसंस्थेच्या माध्यमातून तिच्या स्वातंत्र्य, क्षमता व व्यक्तिमत्वाची उपेक्षा होऊन तीला गुलामासारखे जगणे भाग पाडले आहे. यास मिल यांनी तीव्र विरोध केला आहे तशाच प्रमाणे कुटुंबातंर्गत स्त्रीयांवर होणारा हिंसाचार याही संदर्भात मिलने

विरोध दर्शविला आहे. कौटुंबिक हिंसाचार व कुटुंबातर्गत अत्याचार हा स्त्रीयावर धर्माच्या प्रभावामुळे होत असल्याचे मिल यांचे मत आहे. अशाच पध्दतीने अनेक स्त्रीवाद्यांनी स्त्री प्रश्न१९ व्या शतकात विविधांगाने मांडला आहे. या सर्वांच्या विचारातून असे स्पष्ट होते की सार्वजनिक जीवनात स्त्रीचे दुय्यम स्थान आहे. विवाह संस्था आणि कुटुंबसंस्थामधून स्त्रीची खुप मोठया प्रमाणात कोंडी होते व गुलामगिरीचे एक वेगळे स्वरुप दिसते. शिक्षण व व्यवयासापासून स्त्रीयांना वंचित ठेवून व्यक्ति स्वातंत्र्य, व्यक्तिप्रतिष्ठा व समता या मूल्यांचा दूरान्वये संबंध नसल्याचे चित्र सर्वत्र निर्माण झाल्याचे स्पष्ट होते.

याच दरम्यान अमेरिकेमध्ये असलेली प्रस्थपित गुलामगिरी मताधिकाराच्या लढयात स्त्रियांनी मोठया प्रमाणात लढा ऊभा करुन स्त्रीयांच्या स्वातंन्त्र्याचा जाहीरनामा घोषित केला. यामध्ये स्त्रीयांना शिक्षण व कुटुंबव्यवस्थामध्ये तसेच मालमत्तेमध्ये समान संधी मिळावी या मागण्या होत्या. १८६६ मध्ये स्त्री कार्यकर्त्यानी मताधिकारासाठी लढा दिला असता, केवळ कृष्णवर्णीयांना मतअधिकार मिळाला, त्यामुळे स्त्रीमताधिकाराची चळवळ सुरु राहीली. नॅशनल अमेरिकन वुमेन सफ्रेज स्थापना १८९० झाली तेंव्हापासून ते १९२० पर्यत स्त्रिांनी मतधिकाराची संघर्ष केला आणि १९२० पासून स्त्रियांना मतधिकार प्राप्त झाला. उदारमतवादी विचारांच्या आधारावर स्त्रियांना खाजगी व सार्वजनिक जीवनात आपल्या स्वातंत्र्य व व्यक्तिगत हक्कांसाठी संघर्षाला वेग आला. खाजगी जीवनातून स्त्री—पुरुष समतेचा आग्रह धरत कुटुंब आणि विवाहसंस्थेमध्ये या चळवळीच्या माध्यमातून अनेक सुधारणा सुचविण्यात आल्या. विषेत: शिक्षणाचा हक्क व संपत्तीचे आधिकारावर भर देण्यात आला. तसचे सर्वाजनकि जीवनात नागरिकत्वाचे हक्क व पुरुषांच्या बरोबरीने व्यवसायांमध्ये समान संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठीही अनेक सुधारणा सुचविल्या गेल्या. त्यामुळे या चळवळीतून स्त्रियांच्या सार्वजनिक व खाजगी जीवनातील समस्यांनी वाचा फोडण्याचे कार्य मोठया प्रमाणात झाले.

**स्त्रीवादाचा प्रवाह** १९ व्या आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात ज्या स्त्रीवादी चळवळी झाल्या त्यास स्त्रिा स्त्रीवादीचा पहिला प्रवाह म्हटले जाते. यात प्रामुख्याने इंग्लड, अमेरिका, येथून स्त्रीवादी चळवळीच्या माध्यमातून स्त्री मतधिकाराच्या बरोबरीने लैंगिकता, प्रजनन आणि आर्थिक हक्कांची मागणी करण्यात आली. अनेक राष्ट्रांमध्ये महिलांचे मतधिकार प्राप्त झाले. अमेरिका इंग्लडच्या बरोबरीनेच चीन, अरब, इराण, फान्स, येथे मोठया प्रमाणात स्त्रीवादी चळवळी झाल्या. त्यानंतर २० व्या शतकाच्या मध्यवर्धात स्त्रीवादांचा दुसरा प्रवाह चालू झाला असे मानले जाते. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक, सांस्कृतिक असमानतेच्या संदर्भात आवाज उठवला गेला. या प्रवाहामध्ये सामाजिक — सास्कृतिक आणि राजकीय असमानतेमध्ये दृढसंबंध असून खाजगी जीवनातही खोलवर राजकारण आहे असे विचार मांडण्यात आले. प्रामुख्याने सीमॅन दी बुव्हा यांनी ''दी सेकंड सेक्स'' या पुस्ताकच्या माध्यमातून स्त्रियांवर होणा—या अत्याचारावर भाष्य केले आहे. कॅरॉल हॅनीश यांनी ''द पर्सनल इस पॉलिटिकल'' हे घोषवाक्य तयार केले आणि खाजगी जीवनाचे कसे राजकीयकरण झाले आहे या बदद्लचे विचार मांडले आहेत. २० व्या शतकातच्या उत्तरार्धात आणि २१ व्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्रीवादाच्या तिस—या प्रवाहाला सुरुवात झाली. प्रामुख्याने दुस—या प्रवाहातील अपयशास प्रतिसाद म्हणून तिसरा प्रवाहास सुरुवात झाली. या प्रवाहातील स्त्रींयाच्या मते, दुसरा प्रवाह हा उच्चवर्णीय व उच्चमध्यमवर्णीय गो—यास्त्रियांच्या प्रश्नावर आधारीत असल्याचे सांगून सुक्ष्म राजकारणवर भर देण्याचे ठरविले. तिस—या प्रवाहातील स्त्रीवादी चळवळी जसे सुक्ष्म राजकारणावर भर दिला तसेच जागतिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील विशेष प्रश्न हाताळने आवश्यक आहे असे ठरविले. म्हणजेच, लिंगआधारीत भेदभाव जाणून घेण्यासाठी वंशवाद, वर्गवाद आणि वसाहतवाद या चौकटीत विचार केला पाहिजे अशी मांडणी झाली. तिस—या प्रवाहामध्ये स्त्रिवादाअंतर्गत असलेले वाद आणि भेद याचाही संदर्भ देता येईल ज्यामुळे स्त्रीवादाचे विविध प्रकार अस्तिवात येऊ लागले. उदा. जहालवादी स्त्रीवाद हा स्त्रीयांचे शोषण पुरुषनियंत्रित भांडवली व्यवस्थेत होत असतो असे प्रतिपादीत करुन संपूर्ण पुरुषनियंत्रण उचकटून टाकून समाजाच्या संपूर्ण पुर्नरचनेच्या माध्यमातून स्त्रीयांना न्याय मिळू शकेल असे मानतात. विभक्त स्त्रीवादी भिन्न लैंगिक संबंधास विरोध करतात. भौतिकवाद विचारसरणीवर आधारित मार्क्सवादी स्त्रीवाद महिलांच्या शोषणाचे मूळ कारण भांडवलशहीमध्ये रुजलेली आहे. तसेच स्त्रीयांच्या कैंटुबिक जीवनात व नोकरीच्या ठिकाणी जो भेद होतो तोही भांडवलशाही विचारप्रणालीच्या प्रभावामुळे. समाजवादी स्त्रीवाद मार्क्सवादी स्त्रीवादापासून फारकत करुन त्यांच्यामते समाज्यातील स्त्रीयांवर अत्याचर करणारे घटक म्हणजे आर्थिक आणि सांस्कृति स्त्रोत त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक स्त्रोताच्या समाप्ती मधूनच स्त्रीमुक्ती घडू शकते.

स्त्रीवादाचा दुसराप्रकार म्हणजे कृष्णवर्णीय आणि उत्तर वसाहतवादी स्त्रीवाद या स्त्रीवादाच्या माध्यमातून पाश्चात्य स्त्रीवादाला आव्हान दिले जाते. स्त्रीवादी चळवळी आणि त्यातून होणारे सैद्यांतिक विकास हे प्रामुख्याने पाश्चात्य युरोप आणि उत्तर अमेरकेतील मध्यमवर्गीय, गो—या स्त्रियांच्या नेतृत्वाच्या प्रभावाने घडले आहे. १९६० च्या दशकात अमेरीकेतील नागरी हक्कांच्या चळवळीच्या माध्यमातून इतर वंशाच्या स्त्रीयांकडून पर्यायी स्त्रीवाद प्रतिपादीत करण्यात आला. विशेषत विकसनशिल राष्ट्राच्या स्त्रीया व वसाहतवाद अंतर्गत राष्ट्रामधील स्त्रीया ज्यांचे वर्ण, वंश वेगळे आहेत जे गरीबीत राहत आहेत अशा स्त्रीयांनी पर्यायी स्त्रीवादाचे प्रस्ताव मांडले. उत्तर वसाहतवादी स्त्रीवादाच्यामते, वसाहतवादी शोषण आणि पाश्चात्य स्त्रीवाद, उत्तर वसाहतवादी स्त्रीयांना परिघात ठेवले. परंतु या स्त्रीयांना सक्रिय राहण्यास व मत मांडण्यास संधी दिली त्यामधूनच तीसल्या जगातील स्त्रीवाद जे उत्तर वसाहतवादी स्त्रीवादी विचाराशी जुळते आहे हे उदयास आले. २० व्या शतकातील उत्तरार्धात सामाजिक रचनेवर आधारित उत्तर रचनावादी स्त्रीवाद मांडण्यात आला. हा स्त्रीवाद, उत्तररचनावादाच्या तत्वाज्ञानांवर आधारित असून असे प्रतिवादित करते कि लिंगभावाची संकल्पना सामाजिक आणि सांस्कृतिक विचारसणीतून निर्माण झाली आहे. त्याचाच आधार घेऊन उत्तर आधुनिक स्त्रीवादयानी सुध्दा लिंगभेदाच्या सामाजिक रचनेवर आणि त्यामधुन निर्माण होणा—या वस्तुस्थितीच्या स्वरुपावर भर देतात. या विसाव्या शतकातील उत्तरार्धात व २१ व्या शताकातील पूर्वाधात लिंगभाव भुमिका या सामाजिक रचनेवर आधारित असल्यामुळे व प्रत्येक राष्ट्राच्या व प्रदेशाच्या स्त्रीया भिन्न सामाजिक आणि संस्कृतिक परिस्थितीमध्ये भेदभाव, शोषण अनुभवतात. त्यामुळे सर्व स्त्रिया विशिष्ठ प्रकाराच्या शोषणाच्या बळी ठरतात असे सामान्यकरण आपण करु शकत नाही असे म्हणत असता उत्तर स्त्रिवादी वसाहतवादी स्त्रीवादामधून असे स्पष्ट झाले आहे की, प्रत्येक राष्ट्रात स्त्रिशोषणांची मुळेही त्या त्या राष्ट्राच्या/ प्रदेशाच्या / वंशाच्या/ जातीच्या / धर्माच्या / वर्गाच्या / सामाजिक/ सांस्कृतीक परिस्थितीवर आधारित असते. या पार्श्वभूमी आपण भारतातील स्त्रीवादी चळवळचा वेगळेपणा जाणून घेण्याचा प्रयत्न करू.

**भारतातील स्त्रीवादी चळवळ** उत्तर वसाहवादी स्त्रीवादाच्या मांडणीप्रमाणे विचार केल्यास भारतातील वसाहतवादी पूर्व सामाजिक रचनेअंतर्गत स्त्रीयांची भूमिका लक्षात घेतल्यास भारतातील स्त्रीवाद हा पाश्चात्य स्त्री वादापेक्षा वेगळा होता. भारतीय स्त्रीवाद पाश्चात्य राष्ट्रामधील होणारे स्त्रीयांच्या वरील अत्याचार व त्यावर प्रतिक्रिया या सर्वघटनांमुळे प्रभावित झाला. तरीसुध्दा भारताची विशिष्ठ ऐतिहासिक व सामाजिक संस्कृतीच्या आधारावर भारतीय स्त्रीयांच्या दृष्टीकोनातून वेगळी मांडणी करणे आवश्यक होते. त्यामुळे काही पाश्चात्य विचार नाकारवे लागले यामधुनच पाश्चात्य स्त्रीवादापेक्षा भारतीय स्त्रीवाद वेगळया स्वरुपात विकसीत झाला. १९ व्या शतकात भारतात ब्रिटीशांचे स्थीरावणे, पाश्चात्य उदारमतवादी विचार सुशिक्षित भारतीयामध्ये रुजणे ख्रिस्तीमिशना—याच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार झाला परंतू त्याही पुढे जाऊन ख्रिस्ती धर्म प्रसाराच्या माध्यमातून धर्मविषयक चर्चेमुळे स्त्रीला धर्माअंतर्गत दिलेले दुय्यम स्थान धार्मिक ऋढी परंपरेच्या नावाने होणारे सामाजिक, आर्थिक, व लैंगिक शोषण त्या आधारे धर्माने स्त्रिला दिलेले दुय्यम स्थान या सर्व परिस्थिती निर्माण झालेल्या प्रश्नाना वाचा फुटली व धर्म चिकीत्सा व सुधारणेचे युग आले. ब्राम्होसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, रामकृष्णमिशन, सार्वजनिक सत्यधर्म या सर्व संस्थाच्या माध्यमातून भारतीय समाज्यातील धर्माच्या आधारे होणारे स्त्रीवरील अत्याचार, सामाजिक दुरवस्था व गुलाम बनवणारी प्रथा तसेच तीचे वस्तुकरण करणा—या ज्ञानापासून वंचित ठेवणा—या सर्व अनिष्ठ प्रथा, परंपराच्या विरोधात या समाज सुधारकांनी आवाज उठविला. भारतीय धर्मावर आधारित सामाजिक अनिष्ठ प्रथा निर्माण झाल्या म्हणजेच सती प्रथा, विधवा विवाहाला बंदी, केशवपन, बालविवाह यासारख्या स्त्रीयांच्या व्यक्तीमत्व आणि मानवी हक्क नाकारुन उपमर्द करणा—या अशा अनिष्ठ प्रथा विरुध्द पहिल्यांदा भारतामध्ये पुरुषाच्याकडून पुढाकार घेतला गेला. त्यामध्ये राजाराम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विदयासागर, गोपाळहरी देशमुख, जोतिबा फुले, महादेव गो. रानडे, गोपाळ गणेश आगरकर व काही काळानंतर त्याच्या कुटुंबातील स्त्रीया उदा. सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे अशा माहिलांनी सुध्दा भारतीय समाजातील धर्मावर आधारित स्त्री शोषणाच्या विरोधात सक्रिय झाल्या. भारतातील स्त्रीवादी चळवळीचा हा पहिला प्रवाह म्हणू शकतो. यामध्ये प्रामुख्याने स्त्री शिक्षण आणि स्त्रीपुरुष समाता यावर आधरित प्रसार करण्यात आला त्यांच बरोबर स्त्रीयांना समाज्यात पुरुषांच्या बरोबरीने समान दर्जा प्राप्त होण्यासाठी कायदयाचीही मांडणी करण्यात आली.

या समाजसुधारकांच्या केलेल्या प्रयत्नामुळेच स्त्रीजीवनाशी निगडीत अनेक कायदे झाले १८२९ मध्ये सतीबंदीचा कायदा, १८५६ मध्ये विधवा पुर्नविवाहाचा कायदा, १८६० मध्ये संमती वयाची मर्यादा १० वर निर्धारित झाली. १८९० साली काशीबाई कनिटकर, पंडिता रमाबाई यांच्या प्रयत्नाने तसेच पुण्यातील शेकडो स्त्रीयांच्या मागण्यानुसार, मुंबईमधील सत्याशोधक समाज्याच्या सदस्यानी दिलेला पाठिंबा, नारायण मेघाजी लोंखडे (कामगार चळवळीचे जनक) नाव्ही समाज्याच्या पाठिंबा या सर्वांच्या प्रयत्नामुळे मुलीच्या संमतीचे वय निश्चत करण्यात आले. १८७१ साली मद्रास मध्ये विधवा पुर्नविवाहाची सूरवा झाली व विरेशलिंगम पंतलू यांच्या नेतृत्वाखाली विधवा पुर्नविवाहाची चळवळ सुरु झाली. १८८९ च्या काळात महाराष्ट्रातील विधवा साठी पहिले वसतिगृह पंडिता रमाबाई यांनी शारदासदन नावाने मुंबईत सुरु केले. महात्मा फुले यांनी विधवा स्त्रीवर झालेल्या लैंगिक अत्याचारामुळे राहणा—या गर्भाची भ्रुणहत्या होऊ नये म्हणून आधार गृह सुरु केले. १८८३ मध्ये त्यांनी बालहत्याप्रतिबंध गृहाची स्थापना केली. जोतीबांची बालहत्या प्रतिबंधक गृह ही भारतातील पाहिली संस्था जी एका ब्राम्हणेत्तराने मोठया धैर्याने व दयाभूत अतं:करणाने आणि परोपकारबुध्दीने विशेषत: ब्राम्हण विधवांसाठी काढली होती. ब्राम्हण विधवांना भ्रुणहत्या, बालहत्या, आत्महत्या व पोलीस कारवाईच्या पाशातून मुक्तता करण्यासाठी या संस्थेची त्यांनी स्थापना केली. केशवपन, बालविवाह अशा समाजातील अघोरी प्रथेला त्यांनी विरोध केला व स्त्री सुधारणेला आधिक महत्तव दिले. त्यांनी पितृसत्ताक कुटूंबपध्दतीवर टिका केली. पितृसत्ताक व पुरुषप्रधान व्यवस्था ही एकुणच कुटूंबाच्या व समाजाच्या पिळवणुकीचे व दडपणुकीचे महत्त्वाचे अंग आहे त्यांनी ‘सार्वजनिक सत्यधर्म’ या पुस्तकामध्ये स्त्रियांच्या असमानतेबाबत लिहले त्यांनी जातीव्यवस्था, पुरुषप्रधान संस्कृती यांच्यामधून स्त्रियांची मूक्तता करण्यासाठी त्यांनी कुटुंबपध्दतीची पुर्नरचना हा विचार व कार्यक्रम मांडला. स्त्री चळवळीला त्यांनी प्रोत्साहन देणारे विचार मांडून शुद्र, अतिशुद्र, शेतकरी म्हणून नव्हे तर स्त्री म्हणून स्त्रियांचे शोषण कसे होते. हे समाजाला दाखवून दिले त्यांनी आपल्या चळवळीत शुद्र, अतिशुद्रांना समानतेचे व बरोबरीने स्थान दिले. कुटुंबातील व समाजातील स्त्रियांची गुलामगिरी व शोषण लक्षात घेवून त्यांनी स्त्रियांच्या गुलामगिरी विरोधात बंड केले. स्त्रीयांच्या मुक्तीसाठी त्यांनी कौटुंबिक कार्यक्रम आखला. स्त्रियांची गुलामगिरी सामाजिक कारणामुळे होते, त्यांना त्यातून बाहेर काढयासाठी ज्ञानाची आवश्यकता ओळखून त्यांनी स्त्री शिक्षणाला महत्व दिले स्त्रिया सुशिक्षित झाल्या तर कुटूंब व समाजाला पुढे नेतील हा मूलभूत विचार मांडून त्यांनी कृती केली.

भारतातील स्त्रीवादाचा अभ्यास करत असताना भारतामध्ये विकसित झालेल्या स्त्रिवादाच्या दृष्टीने ज्यांनी — ज्यांनी लिंगभाव चिंतन केले. त्यांच्या विचारांचा अभ्यास करण्याची गरज आहे. एकंदरीत भारतीय स्त्रिवादाचा ऐतिहासिक आढावा घेत असताना आपल्याला असे दिसून येते की, भारतातील जो मुख्य प्रवाहातील स्त्रीवाद होता ज्यामधून जे स्त्रीप्रश्न हाताळले जात होते ते बहुतांश विवाहसंस्था आणि कुटूंबसंस्था व कौटुंबिक हिंसाचार व लैंगिकशोषण या भोवती सुधारणेची मागणी करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतीय स्त्रिवादाचा विचार करत असताना फुले, आगरकर, आंबेडकर यांचा विचार महत्त्वाचा ठरतो फुले व आगरकरांचा विचार केल्यास सुरवातीच्या काळात विवाहसंस्था व कुटूंबसंस्थेच्या अंतर्गत होणा—या हिंसाचार व लैगिक शोषणाची जाणीव असल्यामुळे या दोन्ही संस्थामध्ये सुधारणा झाल्या पाहिजेत असा विचार त्यांनी मांडला व तशी कृतीही केली. प्रामुख्याने उच्चवर्णीय समाजामध्ये स्त्रियांच्यावर मोठयाप्रमाणात अन्याय होत होता. बालविवाह, विधवा, केशवपन, बालजरठविवाह, विधवा— गरोदर स्त्रियांचे प्रश्न या बाबतीत महात्मा फुल्यांनी कार्य केले. या अनिष्ठ प्रथा व रुढी प्रामख्याने उच्चवर्णीय समाजातच होत्या त्याला त्यांनी विरोध करुन कृती केली. त्यामुळे भारतातील स्त्रीवादाच्या स्वरूपात असल्याचे टिका केली जाते. अनेक सुधारणावादायांनी ब्राम्हणस्त्रियांचे होणा—या शोषणाविषयी सुधारणांची मागणी केली व त्यामुळे सुरवातीच्या काळात भारतीयस्त्रीवाद, ब्राम्हणी स्त्रीवादाच्या स्वरूपात होता असे म्हणणे वावगे ठरणार नाही कारण जातव्यवस्था वर्णव्यवस्थेस धका न पोचवता स्त्रीयांचे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न झाले यास आपवाद म्हणजे महात्मा फुले, आगरकर व डॉ. आंबेडकर हे होत. महात्मा फुलेंनी जातीव्यवस्था, पितृसत्ताक समाज व शिक्षण यांना महत्तव देवून, उच्चवर्णीय समाजातील स्त्रीयांच्या बरोबरीने शुद्र, अतिशुद्र व समाजातील तळागाळातील स्त्रियांचे प्रश्नही त्यांनी हाताळले. कुटुंब व विवाहसंस्थेच्या पितृसत्ताक समाजाच्या माध्यमातून स्त्रियांच्यावर जे अन्याय होतात ते त्यांनी आपल्या विचारांच्या माध्यमातून प्रखडपणे मांडले. समाज व जातीच्या अंतर्गत स्त्रियांचे होणारे शोषण फुलेच्या विचारातून व्यक्त होतात. रमाबाई रानडे यांचे कार्य व ताराबाई शिंदे यांनी लिहलेल्या स्त्री पुरुष तुलना याला जसे स्त्री प्रश्नांच्या बाबतीत मोल आहे तसेच

महात्मा फुलेंचे स्त्रीविषयक विचार व जातीव्यवस्थेच्या बाबतीत उचलले प्रश्न यालाही महत्तव आहे. म्हणून एकोणीसाव्या शतकात फुलेच्या विचारसाणीचा वारसा घेवून स्त्रीयांना माणूस म्हणून जगता यावे या विचारांवर आधारीत काही पुरुष व स्त्रीसुधारकांनी स्त्री प्रश्नाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला त्यामध्ये अग्रक्रमाने सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, ताराबाई शिंदे, पंडित रमाबाई, आनंदीबाई जोशी, कशीबाई कनिटकर यांचे कार्यही मोलाचे ठरते. याच पार्श्वभूमीवर पुरुषंसुधारकांनी सुरु केलेल्या स्त्रीचवळीला भारतात पुढे विस्तारीत स्वरुप प्राप्त झाले. भारतीय स्वातंत्र्यलढयाच्या चळवळीत स्त्रियांनी महात्मा गांधीच्या प्रेरणेने मोठया हिरीरीने सहाभाग घेतला. वेगवेगळया पध्दतीने स्त्रियांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या स्वतंत्र चळवळीमध्ये सहभाग घेतला व यामधून स्त्रियांसुध्दा सार्वजनिक क्षेत्रामध्ये सहभागी होवू शकतात व यशस्वीरित्या आपल्या जबाबदारी पार पाडू शकतात हे सिध्द होवून देखिल स्वातंत्र्योत्तर काळात पुन्हा स्त्रिया चूल आणि मूल या भूमिकेत दडपल्या गेल्या.फुलें यांचे स्त्रियांच्या संदर्भातील शोषणाचे स्त्रोत लक्षात घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनानिर्मिती करीत असताना अस्पृश्य निवारण्याच्या संदर्भात जसा विचार केला तसाच भारतीय समाजातील स्त्रियांच्या संदर्भातही सखोल विचार करूनच स्त्री–पुरूष समानतेच्या दृष्टीने घटनात्मक तरतुदी करण्यात आल्या. भारतीय समाजातील स्त्री वर्ग हा अतिशुद्र असल्याचे त्यांना जाणीव असल्यामुळे स्त्री शोषणाचे मुळ स्त्रोत म्हणजे मनुस्मृती हे जाणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे दहन केले होते. मनुस्मृतीचे दहन झाले असले तरीही मनुस्मृतीची सखोल मानसिकतेचे दहन आपण करू शकलो नाही.

१९७० च्या दशकात भारतीय समाज व्यवस्थे मध्ये खाजगी व सार्वजनिक जीवनात होणारे शोषणाच्या पार्श्वभूमीवर अनेक स्त्री संघटना व गट स्थापन होऊ लागले आणि समाजनेची मागणी करु लागले. १९७४ मध्ये “भारतीय समाजातील स्त्रिांचा दजा '– समाजनतेच्या **दी**शेने ” या अहवालाद्वारे असे निदर्शनास आणले गेले की खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रात सर्व स्तरांवर स्त्रियांचा दर्जा दुय्यम आहे. १९९० च्या दशकात दलित, आदिवासी,मुस्लिम व तसेच इतर अल्पसंख्यांक स्त्रियांच्याकडून त्या त्या गटांच्या अंतर्गत असलेल्या विशेष प्रश्नांच्याकडे मुख्य प्रवाहातील स्त्री संघटनेनी दुर्लक्ष केल्याचे आव्हान त्यांच्यापुढे उभे केले. मुख्य प्रवाहातील संघटना शिक्षण, रोजगार, आरक्षण कौटुबिंक अत्याचर, बालविवाह, कामांच्या ठिकाणी लैगिंक शोषण इ. प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करुन कार्य केले. हे सर्व प्रश्न उच्चवर्गीय व उच्चवर्णिय स्त्रियांच्या बाबतील असल्याचे विविध जाती – धर्मातील स्त्रियांच्याकडून आवाज अठविला गेला. या नैराश्यातूनच दलित स्त्रियांना या मुख्य प्रवाहातून बाहेर पडून दलित स्त्री मुक्ती संघटना स्थापन केल्या. अशाच पध्दतीने मुस्लिम स्त्री संघटना, ग्रामीण भागातील स्त्री संघटना, शेतकरी मजूर स्त्री संघटना, मोलकरीण संघटना इ. संघटना स्थापन होऊ लागल्या याचाच अर्थ २० व्या शतकात मुख्य प्रवाहातील स्त्री संघटनेमध्ये फूट पडून अनेक संघटना निर्माण होताना दिसत आहेत. त्यामुळे स्वातंत्रयत्तोरकाळातील ब्राम्हणी स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप बदलून आज अब्राम्हणी व बहुजनवादी स्त्रीवाद उदयास आल्याचे दिसते. भारतात स्त्रियांनी आपले विविध प्रश्न सोडवण्यासाठी वेगळया व स्वतंत्र्य संघटना स्थापन करुन नवीन चळवळ उभी केली. ब्राम्हणी व अब्राम्हणी या स्त्रीवादाच्या जाळयात आजही भारतीय स्त्रिवाद गुरफटलेला दिसतो राज्य आणि केंद्र पातळीवर ३३: आरक्षणाच्या मुदद्यावरुन पुन्हा एकदा जात, धर्म या आधारावर विविध स्त्री संघटनांनी आपले आस्तित्व टिकवण्याची मागणी केले. त्या वरुनही महिला संघटनामधील मतभेद स्पष्ट होते.एकदरीत पाहता भारतातील स्त्रीवादी चळवळीवर पाश्चात्य स्त्रीवादी चळवळीचा प्रभाव सुरुवातीपासून आजपर्यत ही दिसून येतो. जागतिक स्त्रीवादी चळवळीत जसे कृष्णवर्णीय स्त्री चळवळ, व तिस–या जगातील स्त्रीवाद अशा विविध प्रकारचे स्त्रीवाद निर्माण झाल्याचे दिसून येते. यालाच तात्विक आधार असा की, सर्व स्त्री शोषण त्या त्या प्रादेशिक, सामूहिक समाजाची परिस्थिती आणि संस्कृतीने उभी केलेल्या रचनेवर स्त्रीवाद आधारित असते. म्हणूनच जसे कृष्णवणीयांची स्त्रिांच्या सामाजिक व संस्कृतिक रचना वेगळी असते तसेच त्यांचे प्रश्नही वेगळे असतात याचाच आधार घेऊन दलित स्त्रियांचे दलित, मुस्लिम आदिवासी, ओबीसी, स्त्रियांचे सामाजिक – सांस्कृतिक रचना वेगळे आपल्यामुळे त्यांचे प्रश्नही वेगळे आहेत. त्यामुळे स्त्रीवादामध्ये स्त्री शोषण, व्यक्ती स्वतंत्र्य, तिचे अस्तित्व व समानतेच्या दृष्टीने होत असले तरीही लिंगभेदाची स्त्रोत हे त्या त्या सामाजिक – सांस्कृतिक रचनेमध्येच असतात असे आपण सामान्यकरण करु शकतो.

References:

1) De Beuvoir, Simone,(Translated and edited by H.M.Parshley), The Second Sex, Harmondsworth: Penguin Books,1981 Reprint (1949).(Translated by Bernard Frechtmen), The Ethics of Ambiguity, New York: Philosophical Library,1948,(1947).

2)Fireston, Shulamith, The Dialetic of Sex; The Case for Feminist Revolution, Frogmore; Paladin,1973 Reprint(1971).

3.Fireston, Shulamith, The Femine Mytique, Harmondsworth: Penguin Books,1979 Reprint(1963).

4. Fireston, Shulamith, The Secound Stage, New York: Summit Books,1981. Millett,Kate,Sexual Politics,New York: Ballantine Books May 1980,Secount Printing(1969).

5)Mitchell,Juliet and Cakley,Ann(Eds.), The Right and Wronges of women,Harmondsworth:Penguin Books1976 (1974).

6. भागवत,विद्युत–स्त्रीवादी सामाजिक विचार,डायमंड पब्लिकेशन,पुणे. 7.

7.फडके, य. दि.– महात्मा फुले समग्र वाङ्मय